**महाराष्ट्र शासन**
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी, बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि/२०२३/ 3061 दिनांक : 14 JUL 2023

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेशासाठी संस्थाची माहिती पडताळणी करून अद्यायावत करणेबाबत.**

संदर्भ- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/प्रवेश क्षमता मान्यता/२०२३/२०२ दि.०७.०७.२०२३

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थांची माहिती https://ugpg.dtemaharashtra.gov.in पुणे या लिंकवर दि.१२.०७.२०२३ रोजी पर्यंत अद्यायावत करण्यास कळविण्यात आले होते. परंतु तरी देखिल काही संस्थानी अद्यापपर्यंत प्रवेश प्रक्रियेसाठी माहिती पोर्टलवर सादर केलेली नाही. यास्तव प्रवेश मान्यतेच्या प्रक्रीयेत अडचणी आल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील. याची सर्व प्राचार्य/ संचालक यांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

**( मा.रा.जाधव )**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- १. प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.
२.मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी. (कार्यासन क्र.२अ)

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४७
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

**परिपत्रक**

क्रमांक : २अ/एडीएम/Intake Approval/२०२३/ 202 दिनांक : 7 JUL 2023

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक दिनांक २२.६.२०२३

वरील विषयाबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थांची माहिती https://ugpg.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करण्यास कळविले आहे. संस्थांना संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक ३०.६.२०२३ रोजीपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास कळविले होते. मात्र शिखर परिषदेची मान्यता,शासन मान्यता, विद्यापीठांचे संलग्नीकरण नसल्यामुळे काही संस्थांना सदर माहिती अद्ययावत न करता आल्यामुळे ही मुदत वाढवावी अशी संस्थांची मागणी होती. याबाबत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचेशी झालेल्या चर्चेनुसार संस्थांना माहिती सादर करण्यासाठी दिनांक १२.७.२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

त्यानुसार सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेची **माहिती दिनांक १२.७.२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी**. माहिती अद्ययावत करताना ती अचुक असेल याची विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य/संचालक जबाबदार राहतील.

उपरोक्त मुदतीत संस्थांनी माहिती अद्ययावत न केल्यास, परिणामस्वरुप संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत न झाल्यास होणा-या परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार असेल या बाबीची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ. विनोद मोहितकर)**
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर **दि.१३ जुलै २०२३ रोजी सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. अध्यक्ष/सचिव, सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

४. का. क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.